# त्रिगुणात्मक त्रैमूर्ती

Trigunatmak Traimurti — Datta Aarti · Sant Eknath

त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा।
त्रिगुणी अवतार त्रैलोक्यराणा ।
नेती नेती शब्द न ये अनुमाना ॥
अखंड समाधी ध्यान मुनिजना ॥१ ॥

> जय देव जय देव जय श्री गुरुदत्ता, हो स्वामी अवधूता ।
> आरती ओवाळिता हरली भवचिंता, जय देव जय देव ॥धृ ॥

सबाह्य अभ्यंतरी तू एक दत्त ।
अभाग्यासी कैसी न कळे मात ॥
पराही परतला मग कैचा हेत ।
जन्म मरणाचा पुरलासे अंत ॥२ ॥

दत्त येऊनिया ऊभा ठाकला ।
भावे साष्टांगे प्रणिपात केला ॥
प्रसन्न होऊनि आशीर्वाद दिधला ।
जन्ममरणाचा फेरा चुकवीला ॥३ ॥

दत्त दत्त ऐसें लागले ध्यान ।
हरपले मन झाले उन्मन ॥
मी तू पणाची झाली बोळवण ।
एका जनार्दनी श्रीदत्तध्यान ॥४ ॥